1 7 AUG 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फिरत्या प्रयोगशाळेतून रेशीम शेतीचे मार्गदर्शन


## गावोगावी शेतकऱ्यांना थेट बांधावर माहिती; विद्यापीठाला एक कोटी ३४ लाखांचा निधी

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : रेशीम शेतीचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर ऑफ एक्सलन्स इन्क्युबेशन इन सेरिकल्चरतर्फे 'रेशीम मदत वाहिनी' अर्थात फिरती प्रयोगशाळा ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करून रेशीम शेतीतील नफ्याचे गणित समजावून सांगितले जाईल. ही फिरती प्रयोगशाळा गावोगावी जाणार असून, थेट शेतकऱ्यांच्या बांधावर मार्गदर्शन करणार आहे.



पालकमंत्री सतेज पाटील यांच्या प्रयत्नातून सेंटरला जिल्हा नियोजन समितीतून एक कोटी ३४ लाखांचा निधी मिळाला आहे. रेशीम प्रशिक्षण, शेतकरी मार्गदर्शन व संशोधन, फिरत्या प्रयोगशाळेसाठी ९४ लाख, कृषी पिकांवरील शत्रू व मित्र किडींसाठी २० लाख आणि रेशीम अळ्यांवरील शत्रू किडी व



घरमाशीच्या नियंत्रणासाठी २० लाख रुपये वापरले जाणार आहेत. सेंटरतर्फे रेशीम शास्त्र पदविका व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम २०१७ पासून राबविला जात आहे. त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

फिरत्या प्रयोगशाळेत एलसीडी प्रोजेक्टर असणार आहे. त्याद्वारे शत्रू कीड नियंत्रणात कशी आणावी, रेशीम शेती तंत्रशुद्ध पद्धतीने कशी करावी, अळ्यांवरील कीड नियंत्रणात कसे आणावे, माती परीक्षण कसे करावे यासंदर्भात माहिती दिली जाईल. हातकणंगले, शिरोळ व राधानगरी तालुक्यांतील शेतकरी रेशीम शेतीकडे वळले आहेत. त्यांना मार्गदर्शनाची आवश्यकता असल्याने या तालुक्यांत फिरती प्रयोगशाळा जाईल.

### ऑनलाईन मार्गदर्शन

कोरोनाचा प्रादुर्भाव सुरू झाल्यावरही शेतकऱ्यांना शेतीशाळेच्या माध्यमातून ऑनलाईन मार्गदर्शन केले जात आहे. दर बुधवारी सायंकाळी सात ते रात्री नऊ या वेळेत सुमारे ४०० शेतकरी त्यात सहभागी होत आहेत. आजवर ६० शेतीशाळा झाल्या आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी युकेनिया, युगांडा, रवांडा, इराणमधील कृषी, विज्ञान व तंत्रज्ञान विषयावर व्याख्याते म्हणून मार्गदर्शन केले आहे, अशी माहिती डॉ. ए. डी. जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 AUG 2021
पुढारी

## शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते सकाळी ठीक आठ वाजता ध्वजवंदन करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस.एस. महाजन, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 7 AUG 2021

सकाळ

# आगामी काळात एकजूट हवी

## डॉ. नरेंद्र जाधव ; शिवाजी विद्यापीठातर्फे विशेष व्याख्यान



डॉ. नरेंद्र जाधव

कोल्हापूर, ता. १६ : "कोविडमुळे देशाची आर्थिक प्रगती निश्चितपणे प्रभावित झाली असून, दारिद्र्यरेषेवर असणारी बहुसंख्य कुटुंबे या काळात दारिद्र्यरेषेखाली ढकलली गेली. ही परिस्थिती बदलण्यासाठी नजीकच्या काळात एकजुटीने काम करावे लागेल," असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, राज्यसभा सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातर्फे 'आर्थिक धोरणे व सद्य:स्थिती' या ऑनलाईन व्याख्यानमालेअंतर्गत पहिले पुष्प गुंफले. 'माझा जीवनकाळ' यावर डॉ. जाधव बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात प्रमुख उपस्थित होते.

डॉ. जाधव म्हणाले, "रिझर्व्ह बँकेने काम करण्याच्या तसेच सिद्ध करण्याच्या अनेक संधी उपलब्ध करून दिल्या. भारताच्या आर्थिक धोरण निश्चितीमध्ये रिझर्व्ह बँक, नियोजन आयोग तसेच अन्य विविध समित्यांच्या माध्यमातून योगदान देता आले." त्यांनी इथिओपियातील सरकारचे आर्थिक सल्लागार, हवाला मार्केट अभ्यासासाठी दुबईला गुप्त भेट, इंटरनॅशनल मॉनिटरी फंडमधील साडेचार वर्षे, नॅशनल अॅडव्हायजरी कौन्सिल, नियोजन आयोगातील कारकीर्दिचा आढावा घेतला. सोने बाजार खुला करून तस्करीचे कंबरडे मोडण्याचा सल्लाही त्यांनी सरकारला दिला. त्यांच्या अनुभवाचा लाभ घेण्यासाठी रिझर्व्ह बँकेने चीफ इकॉनॉमिस्ट हे विशेष पद त्यांच्यासाठी निर्माण केले. त्यांच्यानंतर रद्द केले, असेही त्यांनी सांगितले. पुणे विद्यापीठाचे कुलगुरूपद केवळ सामाजिक न्यायाचा फेरा पूर्ण करण्यासाठी स्वीकारले. त्या कारकीर्दीत शिक्षण क्षेत्राला भरीव योगदान देता आले. त्या काळात आपण 'समर्थ भारत अभियाना' ची मुहूर्तमेढ रोवली. ते अभियान आज 'उन्नत भारत' नावाने केंद्र सरकार चालवित आहे, हे मोठे यश असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. जाधव म्हणाले, "सध्या आपण 'आंबेडकर आणि गांधी', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राज्यघटना', 'भारतातील जाती व अमेरिकेतील वंश' ही पुस्तके लिहीत आहे." अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी स्वागत केले. डॉ. यशवंतराव थोरात यांनी परिचय करून दिला.

1 7 AUG 2021 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशात अनेक कुटुंबे कोरोना काळात दरिद्र्यरेषेखाली ढकलली गेली

## डॉ. नरेंद्र जाधव : शिवाजी विद्यापीठात ऑनलाइन व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कोरोनामुळे देशाची आर्थिक प्रगती निश्चित प्रभावित झाली आहे. दारिद्र्यरेषेवर असणारी बहुसंख्य कुटुंबे या काळात दरिद्र्यरेषेखाली ढकलली गेली आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी आपल्या सर्वांना एकजुटीने काम करावे लागणार आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि राज्यसभा सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्यावतीने 'आर्थिक धोरणे व सद्यस्थिती' या विशेष ऑनलाइन व्याख्यानमालेंतर्गत पहिले पुष्प गुंफताना 'माझा जीवनकाळ' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात प्रमुख उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आयुष्यात तत्त्वांशी तडजोड न करता पुढे जायला हवे. प्रतिकूल परिस्थितीतही न डगमगता उभे राहायला शिकले पाहिजे आणि जे कराल, त्यात सर्वश्रेष्ठ होण्याचे ध्येय बाळगले पाहिजे. हे स्वतःच्याच आयुष्यातील अनेक उदाहरणे देऊन डॉ. जाधव यांनी सांगितले.

सध्या 'आंबेडकर आणि गांधी', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राज्यघटना' आणि 'भारतातील जाती व अमेरिकेतील वंश' ही तीन महत्त्वाची पुस्तके लिहीत असल्याचेही त्यांनी सांगितले. डॉ. जाधव यांनी अत्यंत अभिनव आणि ओघवत्या शैलीत त्यांच्या जीवननुभवातून अनेक महत्त्वाचे धडे युवा पिढीला दिले असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी प्रास्ताविक केले. दरम्यान, अर्थशास्त्र विभागाच्यावतीने दर आठवड्याला देश-विदेशातील नामवंत अर्थतज्ज्ञ, शास्त्रज्ञांचे व्याख्यान होणार आहे.

### उन्नत भारत अभियान हेच मोठे यश



भारतीय रिझर्व्ह बँक, इथिओपियातील सरकारचे आर्थिक सल्लागार, हवाला मार्केट अभ्यासासाठी दुबईला भेट, इंटरनॅशनल मॉनिटरी फंडमधील साडेचार वर्षे आणि नॅशनल एडव्हायजरी कौन्सिल व नियोजन आयोगातील कारकीर्द याचा डॉ. जाधव यांनी सविस्तर आढावा घेतला. पुणे विद्यापीठाचे कुलगुरूपदाच्या काळात 'समर्थ भारत अभियाना'ची मुहूर्तमेढ रोवली. हेच अभियान आज 'उन्नत भारत' नावाने केंद्र सरकार चालविते आहे, हे मोठे यश असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

17 AUG 2021 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अमृतमहोत्सवी स्वातंत्र्य दिन सोहळा साजरा

## कोरोना नियम पाळत विविध संस्था, संघटना, शाळांतर्फे कार्यक्रम

**कोल्हापूर : भारतीय स्वातंत्र्य दिनाचा अमृतमहोत्सवी सोहळा विविध संस्था, संघटना, शाळा, महाविद्यालये, तरुण मंडळांतर्फे साजरा केला. कोरोनाचे प्रतिबंधक नियम पाळत विविध कार्यक्रम घेतले. मान्यवरांची भाषणेही ऑनलाईन पद्धतीने घेतली. मास्क, सॅनिटायझरचा वापर, कमीत कमी उपस्थिती अनिवार्य ठेवत कार्यक्रम घेतले.**

### शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा झाला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, विकास राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक अभय जायभाये, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड आदी उपस्थित होते. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत सादर केले.

### भाजप जिल्हा कार्यालय

भारतीय जनता पक्षातर्फे बिंदू चौक येथील जिल्हा कार्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा झाला. ज्येष्ठ कार्यकर्ते राजू बद्दी यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत सामूहिक राष्ट्रगान म्हणून तिरंगा ध्वजास वंदन केले. भाजप कार्यालयात पदाधिकारी, कार्यकर्त्यांसमोर डॉ. गुरव, जिल्हाध्यक्ष राहुल चिकोडे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य महेश जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. सरचिटणीस दिलीप मेत्रीणी, हेमंत आराध्ये, गणेश देसाई, विजय



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यदिनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन केले.



कोल्हापूर : दैनिक 'सकाळ' आणि व्हाईट आर्मी कोविड सेंटर येथे चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे, बोर्डिंगचे अध्यक्ष सुरेश रोटे, व्हाईट आर्मीचे अशोक रोकडे यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले.

केले. अध्यक्ष सतीश करजगार, उपाध्यक्ष नागेश ... उपस्थित होते.



कोल्हापूर : कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघातर्फे (गोकुळ) अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. यावेळी सर्व संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह

मुकुंद गुंजीकर-कुलकर्णी, सारस्वत विकास मंडळांचे सचिव यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. ज्येष्ठ विश्वस्त संजय उर्फ बाबा वाघापूरकर यांनी संस्था परिचय करून दिला. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार झाला. सारस्वत पदवीधर विद्यार्थी आणि वसतिगृहातील १२ वी परीक्षेत सर्वोत्कृष्ट गुण संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा रोख पारितोषिक देऊन गुणगौरव केला. वसतिगृहतील विद्यार्थिनींनी वसतिगृहाविषयी मनोगत व्यक्त केले. वसतिगृह अध्यक्ष मोहन देशपांडे यांनीही मनोगत व्यक्त केले. श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह, सारस्वत विकास मंडळ संस्थाचे पदाधिकारी, विश्वस्त, सभासद, ज्ञाती बांधव, कर्मचारी, वसतिगृहातील निवासी विद्यार्थी उपस्थित होते. वसतिगृहातील विद्यार्थी सौरभ पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सचिव सुधीर कुलकर्णी यांनी आभार मानले.

### आयसीएआय कोल्हापूर शाखा

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 AUG 2021
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यदिन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रविवारी स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सकाळी ठीक आठ वाजता ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, विकास राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक अभय जायभाये, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, आदी उपस्थित होते. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत सादर केले.